किरकोळ दिवाणी अर्ज नं. ३/२०२४
गणपत सातपुते विरुध्द पांडुरंग सातपुते
CNR:MHSN14-000780-2023

## नि.क्र. १८ वरील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मूळ दावा फेर फैलावर घेणेकरीता केलेला असून वि.प.नं. १ दि.१२/१२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस अर्जदार यांना पाच महिन्यांचा विलंब झालेला आहे. वादीनी दाखल केलेला अर्ज हा दावा फैलावर घेणेसाठी असल्याने वर नमूद वि.प. यांचे कायदेशीर वारसांना सदर अर्जामध्ये सामील करणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. त्याकरीता मयत वि.प. वारसांबाबत दुरुस्ती करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. वि.प.नं. १ चे मृत्यूनंतर त्यांचे वारस मुदतीत न घेतलेने वि.प. नं. १ यांचेबाबत अर्जदार यांचा अर्ज अबेट झालेला आहे. सदरचा वारस रेकॉर्डवर घेणेकरीता झालेला विलंब फक्त पाच महिने इतका असून अर्जदार यांना वि.प. यांचा मृत्यू दाखला न मिळालेने विलंब झाला आहे. त्यामुळे अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. सदरचा आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे अशी विनंती केली आहे.

२. जाबदारतर्फे सदर अर्जास अर्जाचे पाठीमागे त्यांचे म्हणणे देऊन असे कथन केले आहे की, अर्जदार यांचा प्रस्तुत अर्ज जाबदार यांना मान्य व कबूल नाही. अर्जदार यांनी अर्जात नमूद मजकुराचे अवलोकन केले असता केवळ वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेकरीता दिले अर्जातील संपूर्ण मजकूर नमूद असलेचे दिसून येते. तथापी, वि.प.नं. १ विरुध्द कायद्याने झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करावा यासंदर्भात कोणतेही कारण अर्जात नमूद नाही. सबब, अर्ज नामंजूर करणेत यावा व मंजूर करणेचा झालेस अर्जदार यांना रक्कम रु. १,५००/- इतकी कॉस्ट करणेत यावी असे कथन केले आहे.

३. अर्जदार यांचा अर्ज, त्यावर जाबदार यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदार व जाबदारतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मूळ दावा फैलावर घेणेकरीता दाखल केला आहे. अर्जदार व जाबदार यांचे कथन तसेच वि.प.नं. १ यांचा मृत्यूचा दाखला पाहता निश्चितच अर्जदार यांना त्यांचे वारस अभिलेखावर घेणेकरीता विलंब झालेला आहे. अर्जदारतर्फे मृत्यू प्रमाणपत्र वेळेत न मिळाल्यामुळे विलंब झाला व त्यामुळे वेळेत वि.प.नं.१ चे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले आहे. अर्जाचा विचार करता वि.प.नं. १ यांचे वारसांचा दावा मिळकतीशी हक्क हितसंबंध आहे व त्यामुळे त्यांना अर्जाचे कामी सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज गुणदोषांवर चालण्याकरिता वि.प.नं. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. मात्र वि.प.नं.१ यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करुन मिळणेकरिता झालेल्या विलंबाची भरपाई म्हणून जाबदार यांना अर्जदार यांनी र.रु. ३००/- कॉस्ट देण्याचा आदेश केल्यास न्यायोचित होणार आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

अर्ज नि.क्र. १८ अर्जदार यांनी जाबदार यांना र.रु. ३००/- कॉस्ट म्हणून देण्याच्या अटींवर मंजूर करण्यात येतो.

DESAI VINAYA ATMARAM Digitally signed by DESAI VINAYA ATMARAM Date: 2025.09.10 18:06:27 +0530

शिराळा

(श्रीमती व्ही. ए. देसाई)

दिनांक १०/०९/२०२५

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, शिराळा

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M. S. Gondkar |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Shirala |
| Date | : | 10/09/2025 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 10/09/2025 |
| Order uploaded on | : | 11/09/2025 |